मुंबई लगतच्या अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासंबंधी निर्णय, अंमलबजावणीसाठी गठीत करण्यात आलेल्या उच्चस्तरीय सुकाणू समितीची पुनर्रचना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्मारक ३१०४/प्र.क्र.६७/२००४/२९
मंत्रालय,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
तारीख:- १९ जानेवारी,२०१६

वाचा:-शासन निर्णय क्र.स्मारक ३१०४/प्र.क्र.६७/२००४/२९,दिनांक २१ डिसेंबर,२०१५

प्रस्तावना:-

मुंबई लगतच्या अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी संदर्भाधीन दि.२१ डिसेंबर,२०१५ च्या शासन निर्णयान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सुकाणू समिती गठीत करण्यात आली होती. सदर शासन निर्णय अधिक्रमित करुन सदर समिती पुनर्गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

शासन निर्णय:-

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सुकाणू समिती नियुक्ती विषयक उक्त संदर्भाधीन शासन निर्णय अधिक्रमित करुन समितीचे खालीलप्रमणे पुनर्गठण करण्यात येत आहे:-

१	मा.मुख्यमंत्री	अध्यक्ष
२	मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम)	सदस्य
३	मा.मंत्री (पर्यटन)	सदस्य
४	मा.मंत्री (वित्त व नियोजन)	सदस्य
५	मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य)	सदस्य
६	मा.पालकमंत्री,मुंबई शहर	सदस्य
७	मा.राज्यमंत्री (सामान्य प्रशासन)	सदस्य
८	श्री.विनायकराव मेटे, विधानपरिषद सदस्य	सदस्य
९	मुख्य सचिव	सदस्य
१०	अप्पर मुख्य सचिव (र.व का.),सामान्य प्रशासन विभाग	सदस्य
११	अप्पर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग	सदस्य
१२	अप्पर मुख्य सचिव,पर्यावरण विभाग	सदस्य
१३	अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग	सदस्य
१४	प्रधान सचिव (नवि-१),नगरविकास विभाग	सदस्य
१५	सचिव (नवि-२),नगर विकास विभाग	सदस्य

१६	आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका	सदस्य
१७	मुख्य कार्यकारी अधिकारी,मेरीटाईम बोर्ड	सदस्य
१८	मुख्य वास्तुशास्त्रज्ञ,महाराष्ट्र राज्य,मुंबई	सदस्य
१९	सचिव(बांधकामे),सार्वजनिक बांधकाम विभाग	सदस्य सचिव

२. आवश्यकतेनुसार अशासकीय सदस्यांच्या व निमंत्रीत सदस्यांच्या नियुक्तीचे अधिकार मा.अध्यक्षांना असतील.

३. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहिल.

(१) श्री.विनायकराव मेटे,विधानपरिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प अंमलबजावणी,देखरेख व समन्वय समितीने शिफारस केलेल्या स्मारकाचा आराखडा, संकल्पना व अन्य शिफारशी विचारात घेणे व त्यास अंतिम मान्यता देणे.

(२) प्रकल्पाशी संबंधीत सर्व निविदांना अंतिम मान्यता देणे

(३) स्मारकाबाबत ऐनवेळी उद्भवलेल्या विषयावर निर्णय घेणे.

(४) स्मारकाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार समितीला असतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११९१७४३३६५८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravikant Ganpat Panchal

Digitally signed by Ravikant Ganpat Panchal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4d632f688a5def40e348dd4096560792e82ea8b6c44eb75bc50ebc2af6045a7c, cn=Ravikant Ganpat Panchal
Date: 2016.01.19 17:45:33 +05'30'

र.ग.पांचाळ
अवर सचिव

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
२) मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम),मंत्रालय,मुंबई
३) मा.मंत्री (पर्यटन),मंत्रालय,मुंबई
४) मा.मंत्री (वित्त व नियोजन),मंत्रालय,मुंबई
५) मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य),मंत्रालय,मुंबई
६) मा.पालकमंत्री,मुंबई शहर,),मंत्रालय,मुंबई
७) मा.राज्यमंत्री (सामान्य प्रशासन),मंत्रालय,मुंबई
८) मा.श्री.विनायकराव मेटे,विधानपरिषद सदस्य,मुंबई

९) मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई
१०) अप्पर मुख्य सचिव (र.व का.),सामान्य प्रशासन विभाग,),मंत्रालय,मुंबई
११) अप्पर मुख्य सचिव (पर्यावरण),पर्यावरण विभाग
१२) प्रधान सचिव (नवि-१),नगरविकास विभाग, मंत्रालय,मुंबई
१३) सचिव (नवि-२),नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
१४) सचिव (बांधकामे),सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई
१५) आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी,मेरी-टाईम बोर्ड,मुंबई
१७) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ,महाराष्ट्र राज्य,मुंबई
१८) निवडनस्ती/का-२९